C.S.(M)09

№ 000237

D-DTN-J-NSB

# MARATHI

## Paper II

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

***INSTRUCTIONS***

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

**SECTION A**

1. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** उताऱ्यांचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *20×3=60*

   (a) "कवीस्वरहोः ग्रंथु निका जाला:
   परिं निवृत्तीजोगा नव्हेचि:"

   (b) "हल्लीचे आमचे सरकार, एकंदर सर्व आपले कामगारांस मन मानेल तसे पगार व पेन्शनें देण्याचे इराद्याने नानाप्रकारचे नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून, त्यांचे द्रव्य मोठ्या हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत..."

(c) "अहो, बहुसंख्य बदलले तर अल्पसंख्यही बदलतात. पण नुसतं अल्पसंख्य बदलले तर बहुसंख्य बदलतात असे नाही. तंटे होतात. ते बदलले पाहिजेत जे बदललेत. त्यांना मित्र म्हणून जवळ केले पाहिजे."

(d) "कधी कधी हुडकं कुरतडणाऱ्या रागीट चावक्या, फारोळ्या सुळ्या दाताच्या झिपऱ्या कुत्र्याची भीती जरा जपूनच हे सांगावं लागायचं. कारण जरासा धोंडा वगैरे हिवाळला की काही कुत्रे निघून जात पण काही लई आरकट. म्हणून काही हडं फार मोठं असून व मन व्हऊनही त्या कुत्र्यामुळे घेता येत नव्हतं म्हणून तसाच ते सोडून जायचो. कारण कोण देतो हो आपल्या तोंडातला घास लगेच्या लगे दुसऱ्यांना ? पण काहीही असो. मी गोळा केलेल्या हडकांमुळे अनेक रंगीबेरंगी कापडांना पाजन बसले असेल व त्याच्यामुळे अनेकजनाचे चेहरे खुलून फुलून दिसले असतील."

2. 'सार्वजनिक सत्यधर्म' मधून म. जोतीबा फुले यांनी उद्घोषित केलेल्या समाजबांधणीच्या 'सत्यधर्मा' चे स्वरूप सप्रमाण विशद करा. *60*

3. "सर्वसाधारपणे पीडित, उपेक्षित व दलित मानवसमूहाच्या जगण्यातील भीषणतेचे व कुरुपतेचे आणि सुशिक्षित तरुणवर्गाच्या मनात उसळणाऱ्या वेदनेचे व ठसठसणाऱ्या विद्रोहाचे चित्रण करणे, हे 'जेव्हा मी जात चोरली होती', 'आठवणीचे पक्षी' व 'शिळान् आणि इतर कथा' या दलित-ग्रामीण साहित्यकृतींचे कळसूत्र आहे." सप्रमाण चर्चा करा. *60*

4. "श्रीमंत औंधकरांच्या 'साष्टांग नमस्कारा' बाबत हास्यास्पद प्रचाराच्या मध्यवर्ती सूत्राभोवती महाराष्ट्रातील थोरामोठ्यांच्या छंदिष्टपणाचे विक्षिप्त नमुने गुंफून आचार्य प्र. के. अत्रे यांनी लिहिलेल्या 'साष्टांग नमस्कार' या अतिरेकी छंदिष्टपणाच्या नाट्यमय विडंबनात्मक साहित्यकृतीने यशस्वी नाट्यप्रयोगाच्या लोकप्रियतेचा उच्चांक गाठला." वाङ्मयीनदृष्ट्या चर्चा करा. *60*

## SECTION B

5. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** पद्यखंडांचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *20×3=60*

(a) "जुने कायदे अगदी मोडले जधीपुन आले इंग्रजी
कांदा-भाकर एक्या मोले तुपसाकर मैदासोजी
मोठे मोठे उमराव धारकरी जरब चहूंकडे दरारा
राव्यापरी पिंजऱ्यात कोंडले मायेणीचा चंदीचारा ।।".

(b) "हें अंतरंग पिवळे सरसीरुहाचें ।
भासे मनांत मज अंग तसें तियेचें ।।
गोरोचनापरिस गौर असें गणावें ।
सोनेंच बावनकसें न कसें म्हणावें ?"

(c) "समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा ?
जात्याच रूक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आन्तर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !"

(d) "भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ।
धरिशि, तरि हरिचा सेवक सुधा ।। ध्रु ।।
चराचरीं गुरू तरावयाला नरा शिरावरि हरीं ।
जरा तरि समज धरीं अंतरीं ।।
हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं ।
मठाची उठाठेव कां तरी ।।
वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी ।
हरीचें नांव भवांबुधितरी ।।
काय गळ्यांत घालुनि तुळशीची लांकडें ।
ही काय भवाला दुर करतिल मांकडें ।।
बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें ।
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा ।।
हरीरस सांडुनि घेशी दुधा ।। 1 ।।

6. 'दमयन्ती स्वयंवर' या काव्यकथेचे मूलस्त्रोत कोणते ते थोडक्यात सांगून, त्यावर रघुनाथ पंडिताने आपल्या विदग्ध व तरल कल्पनाशक्तीने सुरेख साज चढविला आहे, तो कसा त्याची चिकित्सा करा. *60*

7. "राष्ट्राच्या अंगात – राष्ट्रातील नागरिकांत – सामर्थ्य आणि वीररस खेळत असल्यामुळे त्यांच्या आविष्कारार्थ पोवाडे आणि लावण्या रचल्या गेल्या." 'पैंजण'च्या आधारे, 'महाराष्ट्र सारस्वत' कार वि. ल. भावे यांच्या या मताचे समीक्षण करा. *60*

8. बालकवी व विंदा करंदीकर किंवा नारायण सुर्वे व नामदेव ढसाळ यांनी, मराठी काव्यपरंपरेला कोणत्या नव्या गुणविशेषांची देणगी दिली ते नमूद करून त्यांनी कोणते मूळ गुणविशेष उंचावले ? कसे ? त्याची चर्चा करा. *60*